**सत्र खटला क्र. ३६/२०२२**
**शासन वि.व्यंकट व इतर**
**नि.क्र.९३**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- संजय ज्ञानेश्वर बेडेकर,

वय- ५२ वर्षे,

व्यवसाय- पो.हे.कॉ. १६७, विवेकानंद पो.स्टे.,लातूर. ,

राहणार- लातूर

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकिल श्रीमती एम.आर कुलकर्णी यांच्या वतीने</u>**

१. सन २०२१ मध्ये मी पोलीस ठाणे औसा येथे पोलिस नाईक म्हणून कार्यरत होतो. दि.०९.०३.२०२१ रोजी संध्याकाळी हजेरी मेजरने बंदोबस्ताची माहिती दिली की, दि.१०.०३.२०२१ रोजी गोंद्री येथे मंदाडे यांच्या शेतात ताबा बंदोबस्त आहे. त्यामुळे दि.१०.०३.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता गोंद्री येथे सतिष मंदाडे यांच्या शेतात स.पो.नि. डोंगरे, बीट जमादार लामतुरे, बोळंगे, महिला शिपाई सुर्यवंशी, पकाले, तुरे असे मिळून बंदोबस्तासाठी गट क्र.३८ क्षेत्र १ एकर ४१ आर या जमीनीत पोहोचलो. त्याठिकाणी जेसीबीची मदत घेवून सतिष मंदाडे हे तारेचे कंमाऊड करीत होते. त्यावेळेस व्यकंट शिंदे, निळकंठ शिंदे व त्यांचे मुले आणि त्यांची आई कस्तुरबाबाई शिंदे हे जेसीबीच्या समोर थांबून काम आडविले. त्यानंतर बीट जमादार आणि तलाठी यांनी त्यांना समजावून सांगितले परंतू ते ऐकत नव्हते. त्यांना जमीनीचे कागदपत्र आहेत का अशी विचारणा केली असता त्यांनी कोणताच कागद दाखविला नाही व काम करू दिले नाही. त्यानंतर जेसीबीच्या समोर कस्तुरबाबाई येवून बसली व कुठलेही काम करू देणार नाही असे सांगितले. त्यानंतर सर्व आरोपी तेथे आले व त्यांनी काम अडविले आणि सांगितले की, ही जमीन आमचीच आहे आणि त्यावर कोणतेच काम करू देणार नाही. त्यानंतर घटनेची माहिती पोलीस निरीक्षक आणि तहसिलदार साहेबांना फोनद्वारे देण्यात आली. आरोपींना गोंधळ करू नका नसता गुन्हा दाखल होईल अशी कल्पना देवून आम्ही पोलीस ठाण्यात आलो.

**सत्र खटला क्र. ३६/२०२२**
**शासन वि.व्यंकट व इतर**
**नि.क्र.९३**

आरोपींनी शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यामुळे मी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. आज न्यायालयात काही आरोपी गैरहजर असून हजर असलेले आरोपी तेच आहेत. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.९४/सा.क्र.५** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास आरोपींकरिता विधीज्ञ श्री.बी.एल.शिंदे यांच्या वतीने**

२. **अर्ज नि.क्र.९२ मंजूर झाल्याने उलट तपास तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

स्वाक्षरित/-

(साजिद आ. सैय्यद)

दि.१७.०७.२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

लातूर